# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## प्रादेशिक बातमीपत्र
## सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः12.11.2025** **वारःबुधवार**

---

- भारत - भूतान संबंध भावना, शांती आणि प्रगती या मूल्यांवर आधारित असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाच्या राष्ट्रीय जल पुरस्कारांमध्ये महाराष्ट्राला सर्वोत्कृष्ट राज्य श्रेणीत प्रथम क्रमांक

- नाशिक, नागपूर आणि धाराशिव जिल्हा मध्यवर्ती बँकांना भागभांडवल म्हणून 827 कोटी रुपये देण्यास राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता

- राज्यातल्या विविध महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी आरक्षणाच्या सोडती

आणि

- नवी दिल्लीत लाल किल्ल्याजवळ झालेल्या स्फोटाचा तपास राष्ट्रीय तपास संस्थेकडे

**<u>पंतप्रधान/पूल-मेघना</u>**

भारत - भूतान संबंध भावना, शांती आणि प्रगती या मूल्यांवर आधारित असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल भूतानची राजधानी थिंपु इथं केलं. आपल्या दोन दिवसांच्या भूतान दौऱ्यावर मोदी यांचं काल थिंपु इथं आगमन झालं. भूतानचे राजा जिग्मे खेसर नामग्याल वांगचुक यांच्याशी झालेल्या भेटीदरम्यान पंतप्रधानांनी दोन्ही देशांमधील भागीदारीला विश्वासाचा आधार असल्याचं सांगितलं. कालच्या बैठकीत दोन्ही देशांदरम्यान अक्षय ऊर्जेच्या क्षेत्रात सहकार्यासाठी सामंजस्य करार करण्यात आले.

**<u>जल-पुरस्कार/महा.इन्फोसेंटर-मेघना</u>**

केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाच्या सहाव्या राष्ट्रीय जल पुरस्कारांची काल जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी घोषणा केली. महाराष्ट्रानं सर्वोत्कृष्ट राज्य श्रेणीत प्रथम क्रमांक पटकावला आहे. गुजरात दुसऱ्या तर हरियाणा तिसऱ्या क्रमांकावर आहे. स्थानिक स्वराज्य संस्था गटात नवी मुंबई महापालिकेनं प्रथम पुरस्कार तर पाणी वापर संस्थांमध्ये नाशिक जिल्ह्यातल्या कानिफनाथ संस्थेनं व्दितीय क्रमांक पटकावला आहे.

जलशक्ती मंत्रालयाच्या जलसंसाधन, नदीविकास आणि गंगा संरक्षण विभागातर्फे जलसंरक्षण आणि जलव्यवस्थापनातील उत्कृष्ट कामगिरीला प्रोत्साहन देण्यासाठी हे पुरस्कार देण्यात येतात. पुरस्कार वितरण येत्या 18 नोव्हेंबरला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत होणार असून प्रशस्तिपत्र, चांदीची ढाल, आणि श्रेणीनुसार 1 लाख ते 5 लाख रुपयांपर्यंत रोख पारितोषिक असं पुरस्कारांचं स्वरूप आहे.

10 विविध श्रेणींमध्ये संयुक्त विजेत्यांसह एकंदर 46 संस्था आणि व्यक्तींना या वर्षी सन्मानित केलं जाणार आहे.

**<u>मंत्रीमंडळ-निर्णय/महासंवाद-मेघना</u>**

नाशिक, नागपूर आणि धाराशिव जिल्हा मध्यवर्ती बँकांना भागभांडवल म्हणून 827 कोटी रुपये देण्यास काल राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत विविध निर्णय घेण्यात आले. यात नाशिक जिल्हा बँकेला 672 कोटी, नागपूर जिल्हा बँकेला 81 आणि धाराशिव जिल्हा बँकेला 74 कोटी रुपये देण्यात येणार आहेत. भारतीय रिझर्व्ह बँकेनं या बँकांचं पुनर्भांडवलीकरण आणि पुनरूज्जीवन करण्याबाबत शासनाला सांगितल्यानुसार हे अर्थसहाय्य मंजूर करण्यात आलं आहे.

पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाच्या अहवालातील शिफारशींचा कालावधी आणखी एक वर्षासाठी वाढविण्याचा निर्णय काल घेण्यात आला. त्यानुसार पाचव्या वित्त आयोगाच्या शिफारशी 31 मार्च 2026 पर्यंत लागू राहतील.

राज्यातल्या न्यायालयांचा परिसर, तसंच न्यायमूर्ती आणि न्यायाधीश यांच्या निवासस्थानांच्या सुरक्षेसाठी अतिरिक्त 8 हजार 282 सुरक्षारक्षकांच्या नियुक्तीसही काल मान्यता देण्यात आली.

हिंगोली जिल्ह्यातल्या डिग्रस साठवण तलाव प्रकल्पासाठी सुमारे 91 कोटी आणि सुकळी साठवण तलाव प्रकल्पासाठी 124 कोटी रुपयांच्या निधीची तरतूदही कालच्या बैठकीत करण्यात आली.

**<u>अनावरण/महासंवाद-मेघना</u>**

राज्याच्या कृषी विभागाच्या नवीन बोधचिन्हाचं तसंच 'शाश्वत शेती – समृद्ध शेतकरी' या नवीन घोषवाक्याचं अनावरण काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आलं.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यावेळी  उपस्थित होते. बोधचिन्ह आणि घोषवाक्य स्पर्धेतल्या विजेत्यांचा सत्कार करण्यात आला.

आरक्षण-सोडत/पीटीसी,मासावकर,शिवराज,सीमा-मेघना

राज्यातल्या विविध महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणूका जाहीर झाल्या असून काल आरक्षणाच्या सोडती पार पडल्या. आरक्षणाचं प्रारूप हरकती आणि सूचना मागविण्यासाठी 17 नोव्हेंबरला प्रकाशित करण्यात येणार आहे. तर 24 नोव्हेंबरपर्यंत हरकती आणि सूचना सादर करण्यासाठी मुदत देण्यात आली आहे.

महिलांसाठी 50 टक्के आरक्षण ठेवण्यात आलं आहे.

पुणे महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी 41 प्रभागांसाठी 165 नगरसेवकांच्या जागा आहेत. महिलांसाठीच्या राखीव जागांमुळं 83 नगरसेविका

आणि 82 नगरसेवक असणार आहेत. पिंपरी चिंचवड महापलिकेच्या 32 प्रभागातल्या 128 जागांसाठीही काल सोडत काढण्यात आली.

सांगली-मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या 78 जागांसाठी मिरजेत सोडतीचा कार्यक्रम पार पडला.

नवी मुंबईत चार सदस्यीय प्रभाग रचनेनंतर ही पहिलीच निवडणूक आहे. तर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एकसदस्यीय प्रभाग पद्धतीनुसार 227 प्रभागांमधल्या जागांसाठी सोडत काढण्यात आली.

सोलापूर, धुळे, नांदेड, ठाणे, जालना, नाशिक, चंद्रपूर, लातूर आदी महानगरपालिकांमधल्या जागांसाठीही आरक्षण सोडती काढण्यात आल्याचं आमच्या वार्ताहरांनी कळवलं आहे.

**<u>मुलगी</u>**

**<u>इंट्रो-</u>**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात मुलगी जन्माला येताच तिचं आवश्यक कागदपत्रं देऊन स्वागत करण्याचा आगळावेगळा उपक्रम राबवण्यात येत आहे. या उपक्रमाविषयी ऐकुया अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

**<u>स्क्रीप्ट</u>**-

महिला आणि बालविकास विभागामार्फत 'बेटी पढाओ बेटी बचाओ' ही योजना राबवली जाते. याच योजनेच्या माध्यमातून जन्माला येणाऱ्या मुलींच स्वागत करताना त्या मुलींचं आधार कार्ड, आभाकार्ड, वय  अधिवास आणि राष्ट्रीयत्वाच प्रमाणपत्र तसंच जात प्रमाणपत्र सुद्धा देण्याची संकल्पना जिल्ह्यात राबवण्यात येणार आहे. जिल्ह्यातल्या प्रत्येक तालुक्यामध्ये तहसीलदारांमार्फत प्रत्येकी १० ते १५ मुलींच वेगवेगळी प्रमाणपत्र देऊन स्वागत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.  अशा प्रकारे १०० मुलींना जन्मताच ही प्रमाणपत्र देऊन त्यांच स्वागत करण्याचा पायलट प्रोजेक्ट राबवला जाणार आहे. हा प्रोजेक्ट यशस्वी ठरल्यास शासन मान्यतेने पुढील काळात जन्माला येणाऱ्या प्रत्येक मुलीचं अशाच पद्धतीने स्वागत करण्याचा उपक्रम राबवला जाणार आहे. जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे यांच्या संकल्पनेतून महिला आणि बालकल्याण अधिकारी बापू शिंगारे आणि त्यांची संपूर्ण टीम हा उपक्रम राबविणार असून त्या दृष्टीने त्यांनी कार्यवाही सुद्धा सुरू केली आहे. कणकवलीमध्ये जन्माला आलेल्या एका मुलीला हि सर्व प्रमाणपत्र देऊन तिच स्वागत करण्यात आलं आहे. या सर्व प्रमाणपत्रांसाठी येणार खर्च महिला बाल कल्याण विभाग उचलणार आहे. या कामासाठी आशा स्वयंसेविकांना यासाठी मानधन सुद्धा दिल जाणार आहे. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी सिंधुदुर्गहून निलेश जोशी.

**<u>विनोबाभावे</u>**

विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी आणि अध्यापनाच्या परिणामकारकतेसाठी तयार करण्यात आलेल्या ‘विनोबा भावे ॲप’ संबंधातली कार्यशाळा काल बीडमध्ये पार पडली. शाळांमधल्या विविध शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रमांची माहिती ॲपवर

अपलोड करता येईल. या ॲपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षांचा सरावही करता येणार आहे.

**<u>पॉश</u>**

कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळवणूक प्रतिबंध, मनाई आणि निवारण अधिनियमाच्या अंतर्गत जिल्ह्यातल्या सर्व शासकीय तसंच खाजगी कार्यालयांमध्ये अंतर्गत विशाखा समिती स्थापन करणं बंधनकारक आहे. ज्या ठिकाणी 10 हून अधिक कर्मचारी कार्यरत आहेत, अशा सर्व कार्यालयांना हे बंधन आहे. सर्व खासगी आस्थापनांनी त्यांच्या अंतर्गत समित्यांची ऑनलाइन नोंदणी करणंही आवश्यक आहे.

**<u>स्फोट</u>**

नवी दिल्लीत लाल किल्ल्याजवळ कारमध्ये झालेल्या स्फोटाचा तपास राष्ट्रीय तपास संस्था अर्थात एनआयए कडे सोपवण्यात आला आहे. गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली काल झालेल्या सुरक्षाविषयक उच्चस्तरीय बैठकीनंतर हा निर्णय जाहीर करण्यात आला. या घटनेशी संबंधित प्रत्येक संशयिताची कडक चौकशी करण्यात येईल आणि या घटनेची पाळंमुळं खणून काढण्यात येतील, असं शहा यांनी सांगितलं. दरम्यान, देशात आणि नवी दिल्लीत अतिदक्षतेचा इशारा देण्यात आला असून लाल किल्ला मेट्रो स्थानक प्रवाशांसाठी आणि लाल किल्ला पर्यटकांसाठी बंद ठेवण्यात आला आहे.

**<u>मल्लखांब</u>**

सांगली जिल्ह्यातल्या मिरजमध्ये 19 वर्षाखालील मुला-मुलींच्या राज्यस्तरीय मल्लखांब स्पर्धा आज आणि उद्या होत आहेत. या स्पर्धेसाठी राज्यातल्या 8 विभागातून एकंदर 64 स्पर्धक सहभागी होणार आहेत. यामधून राज्याचा मल्लखांब संघ निवडला जाणा र आहे.

**<u>महिलाक्रिकेट-टी20</u>**

दृष्टीहिन महिलांच्या पहिल्या टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत काल भारतानं विजयी सलामी दिली. नवी दिल्लीत झालेल्या पहिल्या सामन्यात भारतानं श्रीलंकेचा 10 गडी राखून पराभव केला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या श्रीलंकेला 13 षटकं आणि 3 चेंडूंमध्ये 41 धावा करता आल्या. श्रीलंकेनं दिलेलं हे आव्हान भारतानं केवळ 3 षटकांत पार केलं. या स्पर्धेत भारतासह श्रीलंका, नेपाळ, पाकिस्तान, अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया हे सहा संघ सहभागी झाले आहेत.

**<u>हवामान</u>**

राज्यात हवामान कोरडं असून थंडीला सुरवात झाली आहे. सर्वात कमी किमान तापमान गोंदियामध्ये 10 पूर्णांक 5 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**